537

~~565~~

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतमोजणी करावयाची पध्दत**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. १६/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २१ डिसेंबर, २००९.**

## आ दे श

महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या या मधील मतमोजणी करण्याऱ्या प्रकारामध्ये भिन्नता दिसून येते. या सर्व निवडणुका राज्य निवडणूक आयोगाच्या अधिपत्याखाली होत असल्याने अशी भिन्नता असणे योग्य नाही. सर्व प्रकारच्या मतमोजणीमध्ये एकसूत्रता राहावी यासाठी मतमोजणी कशी करावी, यासाठी राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(१) मतमोजणी क्षेत्रात बॅरिकेडिंग अशा रितीने करण्यात यावे की, मतमोजणीच्या ठिकाणी टेबलवर उमेदवार किंवा उमेदवारांचे प्रतिनिधी केवळ बाहेरुन मतमोजणी बघू शकतील. बॅरिकेडिंगच्या आतमध्ये त्यांना प्रवेश करता येणार नाही.

(२) मतमोजणीच्या ठिकाणी शक्य तितकी टेबले लावण्यात यावीत. महानगरपालिकांमध्ये जितके निवडणूक निर्णय अधिकारी असतील तितकी मतमोजणी केंद्र ठेवण्यात यावीत. जेथे प्रभागात, जिल्हा परिषद मतदार विभाग किंवा पंचायत समिती मतदार गणात अथवा नगर परिषदेमध्ये एकापेक्षा जास्त मतदान केंद्रे असतील तेथे प्रत्येक प्रभागासाठी किंवा मतदार विभागासाठी किंवा मतदार गणासाठी एकच टेबल लावण्यात यावे.

(३) त्या टेबलावर त्या प्रभागातील, मतदार विभागातील किंवा मतदार गणातील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र एकावेळी एकच आणण्यात यावे. त्यातील मतमोजणी झाल्यानंतर दुसरे मतदान यंत्र आणण्यात यावे. अशा रितीने मतमोजणी निकाल लागेपर्यंत चालू ठेवावी.

(४) अशा पध्दतीत प्रत्येक उमेदवाराचा एकच प्रतिनिधी मतमोजणीच्या ठिकाणी असतो. अन्य पध्दतीचा अवलंब केल्यास प्रत्येक उमेदवाराचे एकापेक्षा जास्त मतदान प्रतिनिधी असतात.

(५) अन्य पध्दतीचा अवलंब केल्यास त्या प्रभागाचे, मतदार विभागाचे किंवा मतदार गणाची मतमोजणी आटोपल्यानंतर सर्व प्रतिनिधींना बाहेर काढून दुसरे प्रतिनिधी आतमध्ये घेण्यास फार वेळ होतो व मतमोजणीसही उशीर होतो.

(६) पोलिसांकडून अशा सूचना येतात की, मतमोजणीचे काम शक्य तितक्या लवकर आटपावे. अंदाज आल्यानंतर विजयी उमेदवाराची मिरवणूक निघाल्यास कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते. असे प्रसंग टाळण्यासाठी वरीलप्रमाणे सर्व मतमोजणी करावी.

(७) या सूचना सार्वत्रिक निवडणुकांसाठी लागू होतील अथवा पोटनिवडणुकीत ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकापेक्षा जास्त प्रभाग, मतदार विभाग किंवा मतदार गणात एकाच ठिकाणी मतमोजणी करावयाची असेल त्यासाठी लागू होतील. पोटनिवडणुकांसाठी ही पध्दती अवलंबिली पाहिजे असे नाही.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( रा. नी. पांडे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

D:\Removable Disk (G)\DISK१_VOL२ (D)\OLD COMPUTER DATA\CORPORATION\orders.doc

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतमोजणी करावयाची पध्दत**

537 567

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. १६/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २९ मार्च, २०१०.**

**वाचा:- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१६/का-५, दिनांक- २१ डिसेंबर, २००९.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक- २१ डिसेंबर, २००९ रोजी आदेश काढले आहेत की, मतमोजणी करताना एका प्रभागासाठी एकच टेबल लावण्यात यावे. या आदेशामध्ये पुढीलप्रमाणे मजकूर दाखल करण्यात येत आहे :-

(८) मतमोजणीच्यावेळी उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी आणि त्याचा मतमोजणी प्रतिनिधी या तिघांपैकी केवळ दोनच व्यक्तींनी मतमोजणीच्यावेळी उपस्थित राहणे आवश्यक असेल. असे केल्याने मतमोजणीच्या ठिकाणी गर्दी कमी होईल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( रा. नी. पांडे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

D:\Removable Disk (G)\DISK१_VOL२ (D)\OLD COMPUTER DATA\CORPORATION\orders.doc

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २५ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी ( मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतमोजणी करावयाच्या पध्दतीबाबत.

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का.५, दि. २१/१२/२००९ व दि.२९/३/२०१०

महोदय / महोदया,

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतमोजणी करण्याच्या पध्दतीमध्ये एकसुत्रता रहावी यादष्टीने संदर्भांकीत आदेशान्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने असे आदेश देण्यात आले आहेत की, मतमोजणीच्या ठिकाणी शक्य तितकी टेबले लावण्यात यावीत, जेणेकरुन सर्व प्रभागांची, निवडणूक विभाग, निर्वाचक गणांची मतमोजणी एकाचवेळी सुरु करता येणे शक्य होईल. तसेच प्रत्येक प्रभागासाठी / निवडणूक विभागासाठी / निर्वाचक गणासाठी एकच टेबल लावण्यात यावे.

२. उपरोक्त सूचना देण्यामागील उद्देश असा आहे की, वरीलप्रमाणे मतमोजणी केल्यास प्रत्येक उमेदवाराचा एकच प्रतिनिधी मतमोजणीच्या ठिकाणी उपस्थित राहिल्याने, मतमोजणी केंद्रातील उमेदवारांच्या प्रतिनिधींची संख्या मर्यादित राहते. तसेच मतमोजणीची प्रक्रिया

लवकर पूर्ण झाल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याचे प्रसंग उद्‌भवत नाहीत.

३. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असली तरी राज्यातील आगामी महानगरपालिका व जिल्हापरिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या बैठकीमध्ये काही जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रभागनिहाय मतमोजणी करण्यासाठी अनुमती देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

४. वरील पार्श्वभूमीवर स्पष्ट करण्यात येते की, प्रभागनिहाय, निवडणूक विभागनिहाय, निर्वाचक गणनिहाय मतमोजणी करणे अधिक सोईचे होईल असे संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांचे मत झाल्यास त्याप्रमाणे ते मतमोजणी करण्याची पध्दत ठरवून देऊ शकतील. तथापि, त्यासाठी महानगरपालिकेच्या बाबतीत महापालिका आयुक्त यांनी संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्याशी व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्याशी स्थानिक परिस्थितीच्या संदर्भात चर्चा करुन मतमोजणी कशाप्रकारे करावी, याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र